| MHPU01-013912-2015 | दाखल दिनांक | : | २७/११/२०१५ |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | ०२/१२/२०१५ |
| | निकाल दिनांक | : | ३०/०७/२०२६ |
| | कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>१० ०८ ०३ |

## भाग – अ

| अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शिवाजीनगर, पुणे यांचे न्यायालयात<br>**पिठासीन अधिकारी -** ज्यो. वि. पेखळे-पुरकर | |
|---|---|
| **सत्र खटला क्रमांक ७२९/२०१५** | **निशाणी क्रमांक ७७** |
| **गुन्हा नोंद क्र.२०१/२०१५ भारतीय दंड विधान कलम १७९, १८८, २७३, ३२८ व अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ चे कलम २६(२)(i), सह कलम ३(i)(zz)(v), दंडनीय कलम ५९ तसेच कलम २६(२)(iv), २७(३)(डी) आणि कलम २७(३)(इ)** | |
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र सरकार**<br>(पोलीस ठाणे अधिकारी, लोणीकाळभोर पोलीस ठाणे, पुणे यांचे मार्फत). |
| **अभियोग पक्षातर्फे अधिवक्ता** | अति. शासकीय अभियोक्ता कावेडीया, लकडे. |
| आरोपी | **१. सुरेश मिलापचंद ओसवाल**<br>**वय** - ४५ वर्षे, **धंदा** - व्यापार,<br>**राहणार** – लोणी काळभोर, माळीमळा, ता. हवेली, जि. पुणे.<br>**२. नितीन श्रीकृष्ण राठी**<br>[अर्ज (नि.क्र.६) वरील आदेशान्वये |

| | |
|---|---|
| | दिनांक११/१२/२०१७ रोजी **दोषमुक्त**] |
| **आरोपीतर्फे अधिवक्ता** | ए. बी. सुराना |

## भाग – ब

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडला दिनांक | : | २५/०५/२०१५ |
| प्रथम खबरी अहवाल दिनांक | : | २५/०५/२०१५ |
| दोषारोपपत्र दिनांक | : | १६/०८/२०१५ |
| दोषारोप निश्चिती दिनांक | : | २४/१२/२०१९ |
| पुरावा सुरुवात दिनांक | : | १३/११/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवल्याचा दिनांक | : | ३०/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | : | ३०/०७/२०२६ |
| दोषी ठरल्याचा दिनांक, जर असल्यास | : | -- |

## आरोपींचा तपशील

| अ. क्र. | आरोपींची नावे | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप | निर्दोष मुक्त केले किंवा दोषी ठरविण्यात आले | शिक्षा काय दिली. | शिक्षा काय दिली. अटक झाल्यापासून न्यायनिर्णया पर्यत आरोपी कारागृहात होते का? |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | **असल्यास कलम ४२८ फौ. प्र. सं. नुसार सुट** |
| १. | **सुरेश मिलापचंद ओसवाल** | २५/०५/२०१५ | ०३/०७/२०१५ | भा.दं.वि. कलम १७९, १८८, २७३, ३२८ व अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ चे कलम २६(२)(i), सह कलम ३(i)(zz)(v), दंडनीय कलम ५९ तसेच कलम | निर्दोष मुक्त | लागु नाही. | लागु नाही. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २६(२) (iv), २७(३) (डी) आणि कलम २७(३) (इ) | | | |

# न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक ३० जुलै, २०२६)

प्रस्तुत प्रकरणात आरोपी क्रमांक १ हा भारतीय दंड विधान (यानंतर "भा.दं.वि." असा संक्षिप्त उल्लेख) चे कलम १७९, १८८, २७३, ३२८ व अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ चे कलम २६(२)(i), सह कलम ३(i)(zz)(v), दंडनीय कलम ५९ तसेच कलम २६(२)(iv), २७(३)(डी) आणि कलम २७(३)(इ) अन्वये गुन्हा केल्याबाबत संपरीक्षेस सामोरा जात आहे.

२. अभियोग पक्षाची हकिगत थोडक्यात खालीलप्रमाणे -

**अ)** अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ चे कलम ३० पोटकलम (२), खंड (अ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन अन्न सुरक्षा आयुक्त, महाराष्ट्र राज्य, यांचेकडील आदेश क्रमांक एफएसएसए /अधिसूचना/१०६३-२०१४/७ दिनांक १५ जुलै, २०१४ द्वारे सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी स्वादिष्ट, सुगंधीत किंवा अपमिश्रकांसोबत मिसळवली जाते

आणि अन्य नावाने चालणारी किंवा गुटखा, पान मसाला, स्वादिष्ट/सुगंधीत तंबाखू, स्वादिष्ट/सुगंधीत सुपारी, खर्रा या स्वरुपात किंवा कोणत्याही नावाने संबोधली जाणारी किंवा ग्राहकाने मिश्रण करण्यास सुलभ होईल अशा रितीने विकलेली किंवा वितरीत केलेली एक उत्पादन म्हणून किंवा निराळे उत्पादन म्हणून आवेष्टीत केलेली किंवा खुले असलेली आणि/किंवा विकलेली किंवा कसे अशी तंबाखू आणि सुपारी यांची निर्मिती, साठवण, वितरण किंवा विक्री यास दिनांक २०/०७/२०१४ पासून महाराष्ट्र राज्यात एक वर्षाच्या कालावधीकरीता प्रतिबंध करण्यात आलेला होता ( यानंतर सदर आदेशाचा "प्रतिबंधात्मक आदेश" असा संक्षिप्त उल्लेख).

**ब)** दिनांक २५/०५/२०१५ रोजी दुपारी १२.३० वाजेच्या सुमारास खबर देणार अन्न सुरक्षा अधिकारी अस्मिता जयंत टोणपे यांनी त्यांचे कार्यालयातील सहाय्यक आयुक्त (अन्न) शि.बा. कोडगिरे, सहकारी अन्न सुरक्षा अधिकारी सोनवणे, दाभाडे व आढाव यांचेसोबत राजेंद्र जनरल स्टोअर्स, वॉर्ड क्रमांक ५, घर क्रमांक ६७२, महात्मा फुले नगर, माळीमळा, लोणीकाळभोर, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथे भेट देवून तपासणी केली असता तेथे सदर आरोपी क्रमांक १ सुरेश मिलापचंद ओसवाल हा उपस्थित होता व दुकानाचा दैनंदिन व्यवहार पाहत होता. उपरोक्त नमूद पथकाने सदर दुकानाची तपासणी केली असता आरोपी मानवी जीवीतास धोका निर्माण होईल असे बेकायदेशीर विमल पान मसाला पिवळा, विमल पान मसाला जांभळा, वि-१ सुगंधीत तंबाखू पिवळा, वि-१ सुगंधित तंबाखू जांभळा, आर.एम.डी. पान मसाला, एक चुइंग टाबॅको, गोवा १००० पान मसाला, गोवा १००० जर्दा, गोवा १००० गुटखा हिरवा, गोवा १००० गुटखा लाल, रजनीगंधा पान मसाला, आर.एम.डी. गुटखा पाउच असे एकूण रक्कम रुपये

७,३४,१२५/- किमतीचे मानवी आरोग्यास व सेवनास हानिकारक असलेले प्रतिबंधित अन्न पदार्थ विक्रीकरीता साठवणूक केलेला आढळून आला. खबर देणार यांनी सदर प्रतिबंधीत साठयातून प्रत्येक अन्नपदार्थाचे प्रकारामधून प्रत्येकी १ पाकिट व आर.एम.डी. गुटख्याच्या २० पुडया अनौपचारिक नमुना म्हणून विश्लेषणासाठी घेवून उर्वरित साठा पंचांसमक्ष जप्ती पंचनामा करुन ताब्यात घेतला. आरोपी क्रमांक १ ने सदर प्रतिबंधीत अन्नपदार्थाचा साठा कोठून खरेदी केला व मिळवला याबाबत विचारणा केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. सबब, खबर देणार हिने लोणी काळभोर पोलीस ठाणे येथे सदर आरोपीविरुद्ध भा.दं.वि. कलम १७९, १८८, २७३, ३२८ व अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ चे कलम २६(२)(i), सह कलम ३(i)(zz)(v), दंडनीय कलम ५९ तसेच कलम २६(२)(iv), २७(३)(डी) आणि कलम २७(३)(इ) अन्वये गुन्हा केल्याबाबत खबर दाखल केली.

३. खबरीच्या अनुषंगाने उपरोक्त नमूद कलमांप्रमाणे गुन्हा केल्याबाबत आरोपीविरुद्ध गुन्हा क्रमांक २०१/२०१५ नोंद करण्यात आला. गुन्ह्याच्या तपासादरम्यान खबर देणार यांनी जप्त प्रतिबंधीत अन्नपदार्थांच्या साठ्यातून काढलेले नमुने तपासणी विश्लेषणाकरीता राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे यांचेकडे दिनांक २६/०५/२०१५ रोजीच्या पत्रासह पाठविले. दिनांक ३०/०५/२०१२ रोजी त्यांनी जप्त नमुन्यांच्या उत्पादक पेढयांचे संबंधीत उत्पादक तसेच त्या राज्यातील संबंधीत अधिकारी यांना पत्रे पाठविली. प्रयोगशाळेतून नमुन्यांचा तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर खबर देणार यांनी सहाय्यक आयुक्त, पुणे यांचेकडून आवश्यक आदेश प्राप्त करुन जप्त साठा दिनांक २०/०८/२०१५ रोजी

नष्ट केला व त्याबाबत दोन पंचांसमक्ष पंचनामा केला. त्यानंतर खबर देणार यांनी खटला न्यायालयात दाखल करण्याकरीता परवानगी मिळणेबाबत आदेश प्राप्त केले. तपासी अधिकारी तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक मोरे यांनी सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा तयार केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले व तपासाअंती आरोपी क्रमांक १ व २ यांच्याविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. आरोपी क्रमांक २ ने अर्ज (नि.क्र.६) अन्वये त्याला सदर खटल्यातून दोषमुक्त करण्याची मागणी केली. अर्ज (नि.क्र.६) वर दिनांक ११/१२/२०१७ रोजी झालेल्या आदेशान्वये आरोपी क्रमांक २ ला सदर खटल्यातून दोषमुक्त करण्यात आले. सबब, खटल्याचे कामकाज आरोपी क्रमांक १ करीता पुढे चालविण्यात आले.

५. माझे पूर्वाधिकारी यांनी भा.दं.वि. कलम१७९, १८८, २७३, ३२८ व अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ चे कलम २६(२)(i), सह कलम ३(i)(zz)(v), दंडनीय कलम ५९ तसेच कलम २६(२)(iv), २७(३)(डी) आणि कलम २७(३)(इ) प्रमाणे गुन्हा केल्याबाबत आरोपी क्रमांक १ विरुद्ध निशाणी क्रमांक १३ अन्वये दोषारोप निश्चित केला. त्यातील मजकूर आरोपीला त्याच्या भाषेत वाचून व समजावून सांगण्यात आला. आरोपी क्रमांक १ ने निशाणी क्रमांक १४ अन्वये त्याचे निवेदन नोंदवून गुन्हा कबूल नसल्याचे नमुद केले.

६. अभियोग पक्षाचा पुरावा संपल्यानंतर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निशाणी क्रमांक ७५ अन्वये आरोपी क्रमांक १ चे निवेदन

नोंदविण्यात आले. सदर आरोपीने कोणताही गुन्हा केला नसल्याचे व त्याचे विरुद्ध खोटे प्रकरण दाखल करण्यात आले असल्याचा बचाव घेतला आहे.

७. अभियोग पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता कावेडिया व लकडे यांचा तसेच आरोपीतर्फे विधीज्ञ ए.बी.सुराना यांचा युक्तिवाद ऐकला.

८. निर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे त्यावरील माझे निष्कर्षांसह व त्याकरीता दिलेल्या कारणांसह खालीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहेत -

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपी क्रमांक १ ने कोणत्याही व्यक्तीला इजा पोहोचविण्याच्या उद्देशाने किंवा गुन्हा करण्याच्या किंवा गुन्हा करण्यास मदत करण्याच्या उद्देशाने किंवा त्यामुळे इजा पोहोचण्याची शक्यता आहे, हे माहित असूनही मानवी शरीराला अपायकारक असलेले प्रतिबंधित विविध पान मसाले, सुगंधीत तंबाखू व गुटखा इतरांना सेवन करण्यास विक्रीकरीता साठा करुन ठेवला, हे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | **...नाही.** |
| २. | आरोपी क्रमांक १ ने खबर देणार या लोकसेवकाला सत्य सांगण्यास कायदेशीररित्या बांधील असतानाही खबर देणार यांनी कायदेशीर अधिकारांचा वापर करुन प्रतिबंधित साठा कोठून व कोणाकडून मिळविला याबाबत विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देण्यास नकार दिला, हे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय? | **...नाही.** |
| ३. | आरोपी क्रमांक १ ने अन्न सुरक्षा आयुक्त व अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांनी जारी केलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग केला, हे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय? | **...नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ४. | आरोपी क्रमांक १ ने प्रतिबंधीत असुरक्षित अन्नपदार्थ जसे विविध पान मसाले, सुगंधीत तंबाखू व गुटखा सेवन करण्यासाठी अयोग्य होते किंवा अयोग्य आहेत याची महिती असूनही किंवा तसा विश्वास ठेवण्याचे कारण असूनही विक्री केले किंवा विक्रीसाठी साठवणूक केले, हे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय? | **...नाही.** |
| ५. | आरोपी क्रमांक १ ने सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांनी जारी केलेल्या अधिसूचनेद्वारे प्रतिबंधीत केलेल्या व असुरक्षित अन्न पदार्थांची विक्रीकरीता साठवणूक केली, हे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय? | **...नाही.** |
| ६. | आरोपी क्रमांक १ ने ज्या उत्पादक किंवा वितरक यांच्याकडून सदर प्रतिबंधीत अन्नपदार्थ प्राप्त झाले त्या उत्पादकांची किंवा वितरकांची ओळख पटवू शकत नसताना तसेच सदर अन्न पदार्थ असुरक्षित असल्याबाबतची माहिति त्याला अगोदरच मिळालेली असताना सदर प्रतिबंधीत अन्नपदार्थांची विक्रीसाठी साठवणूक केली, हे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | **...नाही.** |
| ७. | आरोपी क्रमांक १ ने मानवी सेवनाकरीता अपायकारक व असुरक्षित असलेले प्रतिबंधीत असुरक्षित अन्नपदार्थ जसे विविध पान मसाले, सुगंधीत तंबाखू आणि गुटखा इत्यादींची विक्री केली तसेच विक्रीकरीता साठवणूक केली, हे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय? | **...नाही.** |
| ८. | अंतिम आदेश? | **...आरोपी क्रमांक १ ला निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

# कारणमिमांसा

९. आरोपी क्रमांक १ वर ठेवण्यात आलेले दोषारोप सिद्ध करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे या न्यायनिर्णयाच्या भाग क्रमांक क मध्ये नमूद केल्याप्रमाणे तोंडी व कागदोपत्री पुरावा देण्यात आला आहे.

१०. अभियोग पक्षातर्फे युक्तिवादादरम्यान असे नमूद करण्यात आले की, सदर आरोपीविरुद्ध ठेवण्यात आलेले दोषारोप सिद्ध होण्याकरीता आवश्यक असणारा सबळ असा तोंडी व कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आलेला आहे. बचाव पक्षातर्फे सदर पुराव्याचे खंडन करण्यात आलेले नाही. त्यामुळे या आरोपीवर ठेवण्यात आलेला दोषारोप संशयातीतपणे सिद्ध झाला आहे.

११. उलटपक्षी बचाव पक्षाचे विधीज्ञ यांनी त्यांच्या युक्तिवादादरम्यान असे नमूद केले की, अभियोग पक्षातर्फे अभिलेखावर देण्यात आलेला पुरावा कमकुवत आहे. अभियोग पक्षाच्या मुख्य साक्षीदारांच्या साक्षीमध्ये महत्वपूर्ण मुद्यांवर तफावत आहे. अभियोग पक्षातर्फे तथाकथित जप्तीच्या वेळी उपस्थित असणा-या स्वतंत्र पंच साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. जप्त मुद्देमाल सिलबंद करण्यात आलेला नव्हता तसेच त्यावर पंचांच्या सह्यांचे लेबल लावण्यात आलेले नव्हते. रासायनिक विश्लेषण अहवालामध्ये सदर अहवाल कोणत्या मुद्देमाला संदर्भात आहे तसेच विश्लेषणाकरीता कोणती पद्धत अवलंबण्यात आली, याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेल्या पुराव्याची एकसंध शृखंला स्थापित होत नाही. आरोपीतर्फे युक्तिवादा दरम्यान असेही नमूद करण्यात आले की, भा.दं.वि. कलम २७३ व अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील तरतुदीन्वये

एकत्रीतपणे खटला चालविता येणार नाही. तथाकथित प्रतिबंधीत अन्नपदार्थांचे कोणी सेवन केले व त्यामुळे त्या व्यक्तीस इजा झाली याबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. पर्यायाने भा.दं.वि. कलम ३२८ अन्वये निश्चित केलेला दोषारोप देखील सिद्ध होत नाही. या पार्श्वभुमीवर बचाव पक्षातर्फे आरोपी क्रमांक १ ची सदर खटल्यातून निर्दोष मुक्तता करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. युक्तिवादाच्या पुष्टयर्थ बचाव पक्षातर्फे खालीलप्रमाणे नमुद न्यायनिर्णयांचा संदर्भ देण्यात आला आहे -

१. **रामनाथ विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य व इतर, अपील क्रमांक ४७२/२०१२** मध्ये **माननीय सर्वोच्च न्यायालय** यांनी दिनांक २१/०२/२०२४ रोजी दिलेला न्यायनिर्णय.

२. **डी.एस.चुइंग प्रोडक्ट एल.एल.पी. व इतर विरुद्ध फूड सेफ्टी अधिकारी तसेच मेसर्स धरमपाल सत्यपाल लिमिटेड व इतर विरुद्ध फुड सेफ्टी अधिकारी, क्रिमिनल एम.सी. क्रमांक ५२१०/२०२२** मध्ये **माननीय दिल्ली उच्च न्यायालय** यांनी दिनांक १३/१२/२०२२ रोजी दिलेला न्यायनिर्णय.

## मुद्दा क्रमांक १ ते ७ करीता :-

**१२.** सदर सर्व मुद्दे परस्पर संलग्न असल्याने विवेचनादरम्यान पुनरावृत्ती टाळण्याकरीता सर्व मुद्दयांचे विवचेन एकत्रितपणे करण्यात येत आहे.

**१३.** खबर देणार व कोडगिरे (अ.सा.क्र.४) हे दोघेही अनुक्रमे तत्कालीन अन्न सुरक्षा अधिकारी व सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन या पदावर कार्यरत होते. त्यांच्या साक्षीनुसार दिनांक १६/०७/२०१४ रोजीपासून पुढील १

वर्षापर्यंत असुरक्षित अन्नपदार्थांबाबत प्रतिबंधात्मक आदेश (नि.क्र.३९) अस्तित्वात होता. दिनांक २५/०५/२०१५ रोजी या दोन्ही साक्षीदारांनी त्यांच्या कार्यालयास प्राप्त झालेल्या माहितीनुसार कार्यालयातील अन्य अन्न सुरक्षा अधिकारी नामे आढाव, सोनवणे व दाभाडे यांच्यासह पंचांसोबत राजेंद्र किराणा स्टोअर्स, लोणीकाळभोर, माळीमळा, तालुका हवेली येथे दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास भेट दिली. तेथे आरोपी क्रमांक १ हजर होता व दुकानाची देखरेख करीत होता. त्यांनी तेथे तपासणी केली असता त्यांना प्रतिबंधात्मक आदेश (नि.क्र.३९) अन्वये प्रतिबंधित केलेला विविध प्रकारचे गुटखा, पान मसाला इत्यादींचा साठा मिळून आला. त्या बाबत खबर देणार हिने तपासणी अहवाल (नि.क्र.४०) तयार केला व जप्ती पंचनामा (नि.क्र.४१) द्वारे सदर साठा पंचांसमक्ष जप्त केला. त्यानंतर तिने खबर (नि.क्र.४२) दाखल केली. या दोन्ही साक्षीदारांच्या साक्षीनुसार त्यांनी घटनास्थळी मिळून आलेल्या प्रतिबंधित अन्नपदार्थांतील प्रत्येकी एक एक अनौपचारिक नमुने विश्लेषणासाठी घेतले व उर्वरित साठा जप्त केला.

**१४.** उपरोक्त दोन्ही साक्षीदारांच्या साक्षी आधारे अभियोग पक्षातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, आरोपी क्रमांक १ दिनांक २५/०५/२०१५ रोजी प्रतिबंधीत अन्नपदार्थ विक्रीकरीता साठवणूक करीत असलेला मिळून आला, हे सिद्ध झाले आहे. तथापि, या ठिकाणी महत्वाची बाब म्हणजे केवळ या दोन साक्षीदारांच्या साक्षी आधारे सदर आरोपीच्या ताब्यात सदर प्रतिबंधीत अन्नपदार्थ मिळून आले, हे संशयातितपणे सिद्ध होते काय हे पहाणे आवश्यक आहे. कारण सदर दोन्ही साक्षीदार अन्न व औषध प्रशासन कार्यालयातील कर्मचारी आहेत. त्यांनी कार्यालयीन कोटा पुर्ण करण्याकरीता या आरोपीविरुद्ध प्रस्तुतचे खोटे

प्रकरण दाखल केले आहे, असा बचाव बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेला आहे. त्यामुळे सर्वप्रथम या साक्षीदारांची साक्ष सबळ, एकसंध व विश्वासार्ह आहे काय, हे पाहणे आवश्यक आहे.

**१५.** उपरोक्त मुद्दयाच्या अनुषंगाने सदर दोन्ही साक्षीदारांच्या साक्षीचे अवलोकन करता असे दिसून येते की, त्यांच्या साक्षीमध्ये महत्वपूर्ण मुद्दयांवर तफावत आहे. खबर देणारच्या साक्षीनुसार आरोपी क्रमांक १ च्या ताब्यात रक्कम रुपये ७,३७,२५०/- किंमतीचा प्रतिबंधीत अन्नपदार्थांचा साठा मिळून आला तर कोडगिरे (अ.सा.क्र.४) यांच्या साक्षीनुसार या आरोपीच्या ताब्यात रक्कम रुपये ७,३४,१२५/- किंमतीचा प्रतिबंधीत अन्न पदार्थांचा साठा मिळून आला. याशिवाय मिळून आलेल्या साठयावर सिल व शिक्का नाही, तसेच सह्यांचे लेबल नाहीत, असे खबर देणारचे कथन आहे. तर सदर साठा सिलबंद केला होता व त्यावर पंचांच्या सह्यांचे लेबल लावले होते, असे कोडगिरे (अ.सा.क्र.४) यांनी साक्षी दरम्यान नमुद केले आहे. या विरोधाभासाच्या अनुषंगाने तपासणी अहवाल (नि.क्र.४०), जप्ती पंचनामा (नि.क्र.४१) तसेच खबर (नि.क्र.४२) चे अवलोकन करता त्यामध्ये देखील सदर प्रतिबंधीत साठा तसेच त्यातून घेतलेले नमुने सिलबंद करण्यात आले व त्यावर पंचांच्या तसेच आरोपी क्रमांक १ च्या सह्यांचे लेबल लावण्यात आले, असे कोठेही नमुद करण्यात आलेले नाही. अशा परिस्थीतीत, या आरोपीच्या ताब्यातून प्रतिबंधीत अन्न पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला, हे संशयातीतपणे सिद्ध होण्याकरीता या दोन्ही साक्षीदारांच्या साक्षीस स्वतंत्र साक्षीदारांच्या साक्षीची जोड मिळणे आवश्यक ठरते. तथापि, अभियोग पक्षातर्फे जप्तीच्या वेळी उपस्थित असणा-या स्वतंत्र पंच साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. या

साक्षीदारांची साक्ष न नोंदविण्याचे कोणतेही कारण देखील अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेले नाही. त्यामुळे या स्वतंत्र पंच साक्षीदारांची साक्ष अभियोग पक्षाच्या कथनाच्या विपरित असेल, असे गृहितक भारतीय पुरावा कायदा कलम ११४(ग) अन्वये निर्माण होते. अभियोग पक्षातर्फे सदर गृहीतकांचे खंडन करण्यात आलेले नाही.

**१६.** उपरोक्त साक्षीदारांव्यतिरिक्त जप्तीच्या कारवाईबाबत अभियोग पक्षातर्फे प्रशांत (अ.सा.क्र.२) या स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आलेली आहे. त्यांच्या साक्षीनुसार घटनास्थळाजवळ त्याचे दुकान होते. दिनांक २५/०५/२०१५ रोजी आरोपी क्रमांक १ च्या दुकानासमोर लोकांची गर्दी जमलेली होती, त्यामुळे तो तेथे जावून आला होता. मात्र त्यानंतर तेथे काय घडले, हे त्याला आठवत नाही. सदर आरोपीला अटक झाल्याचे त्याला २-४ दिवसांनंतर लोकांकडून समजले. मात्र, त्याला कोणत्या कारणासाठी पकडले होते हे ही या साक्षीदाराला माहित नसल्याचे त्यांचे कथन आहे. अभियोग पक्षातर्फे या साक्षीदाराचा उलट तपास नोंदविण्यात आला. मात्र, उलट तपासादरम्यान देखील अभियोग पक्षाच्या कथनास सहाय्यभूत होणारा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे या साक्षीदाराची साक्ष अभियोग पक्षास उपयुक्त होत नाही. अशा परिस्थीतीत, सदर आरोपीच्या ताब्यातून प्रतिबंधित अन्नपदार्थ जप्त करण्यात आले या मुद्दयांवरील खबर देणार व कोडगिरे (अ.सा.क्र.४) या दोन्ही साक्षीदारांच्या साक्षीस अन्य स्वतंत्र साक्षीदाराच्या साक्षीद्वारे पुष्टी मिळालेली नाही. यापुर्वीच नमुद केल्याप्रमाणे या दोन्ही साक्षीदारांच्या साक्षीमध्ये महत्वपूर्ण मुद्दयांवर तफावत असल्याने त्यांची साक्ष सबळ, एकसंध व विश्वासार्ह नाही. त्यामुळे केवळ या दोन्ही

साक्षीदारांच्या साक्षी आधारे आरोपी क्रमांक १ च्या ताब्यातून प्रतिबंधीत अन्नपदार्थ जप्त करण्यात आले, हे संशयातितपणे सिद्ध होत नाही.

**१७.** आरोपी क्रमांक १ च्या ताब्यातून जप्ती पंचनामा (नि.क्र.४१) अन्वये अन्नपदार्थ जप्त करण्यात आले, असे काही वेळाकरीता गृहीत धरले तरीदेखील ते अन्नपदार्थ प्रतिबंधीत असुरक्षित अन्नपदार्थ होते, हे सिद्ध होणे आवश्यक आहे. त्याकरीता जप्त साठयातून कायद्याप्रमाणे काढलेल्या कथित नमुन्यांचे विश्लेषण प्रयोगशाळेत होणे आवश्यक आहे. अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ चे कलम ४७ तसेच अन्न सुरक्षा व मानके नियम, २०११ मधील नियम क्रमांक २.४ अन्वये जप्त साठयातून विश्लेषणाकरीता नमुने काढण्याची तरतूद व नियमावली निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार विश्लेषणाकरीता लागणारे नमुने काढणे आवश्यक असते. सदर तरतुदींनुसार जर जप्त साठ्यातून उत्पादकाने सिलबंद पाकिटात अन्नपदार्थ ठेवला असेल तर नमुन्यांकरीता प्रत्येकी चार पाकिटे काढावी लागतात व त्यावर स्वतंत्रपणे अन्नपदार्थ वेगळया कंटेनरमध्ये घेण्याची आवश्यकता नसते. मात्र, अशा अन्नपदार्थांच्या नमुन्यांवर अन्न पदार्थाचा कोड क्रमांक, अन्नपदार्थ तपासणीकरीता पाठविण्या-या अधिका-याचे नाव, कार्यालयीन हुद्दा, नमुने प्राप्त केल्याची तारीख व ठिकाण, तपासणीकरीता पाठविण्यात आलेल्या वस्तूचे स्वरुप, इत्यादी लेबलवर नमुद करुन त्यावर ज्यांचेकडून सदर नमुना घेण्यात आला त्याची म्हणजेच आरोपीची सही अथवा अंगठ्यांचे निशाण घेवून ते लेबल नमुन्यावर चिटकविणे तसेच आरोपीने सही करण्यास नकार दिल्यास अन्य स्वतंत्र पंचांची सही किंवा अंगठयाचे निशाण त्या लेबलवर घेणे आवश्यक असते. त्यानंतर सदर नमुने पुरेशा जाड कागदामध्ये गुंडाळून डिंकाने पुर्णपणे चिकटवणे आवश्यक असते

व त्यावर संबंधीत अधिका-याची सही, नमुन्याचा कोड क्रमांक, ज्यांच्याकडून सदर नमुना प्राप्त करण्यात आला त्यांची म्हणजेच आरोपीची व त्याने नकार दिल्यास स्वतंत्र पंच साक्षीदाराची सही किंवा अंगठयाचे निशाण, इत्यादी बाबी एका कागदावर व नमुने गुंडाळलेल्या कागदावर दोन्हीकडेही येतील अशा पद्धतीने नमुद करणे आवश्यक असते. अशा प्रकारे सिलबंद केलेले नमुने तपासणीसाठी प्राप्त झाल्यानंतर सदर नमुने पुर्णपणे व योग्य रितीने सिलबंद आहेत किंवा नाहीत, हे पाहणे विश्लेषण करणा-या संबंधित अन्न विश्लेषकाचे काम असते. जर सदर पाकिटावरील सिल तुटलेले दिसत असेल तर संबंधीत अन्न विश्लेषक संबंधीत पदावधीत अधिकारी यांना त्याबाबत कळवून त्या नमुन्यांचा दुसरा भाग पाठविण्याची विनंती करु शकतो.

१८. मात्र, प्रस्तुत प्रकरणात खबर देणार हिच्या साक्षीनुसार तिने जप्त साठयातून तपासणीकरीता किती नमुने काढले, हे दिसून येत नाही. किती नमुने व कशा पद्धतीने काढले हे ही नमुद केलेले नाही. तपासणी अहवाल (नि.क्र.४०) नुसार खबर देणार यांनी जप्त साठयातून प्रत्येकी १ पाकिट नमुना म्हणून विश्लेषणाकरीता काढून ठेवले होते. म्हणजेच खबर देणार यांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ तसेच अन्न सुरक्षा व मानके नियम, २०११ मधील तरतुदींनुसार आवश्यक नमुने तपासणीकरीता काढून ठेवल्याचे दिसून येत नाही. या शिवाय खबर देणार हिने साक्षीदरम्यान हे मान्य केले आहे की, जप्त साठयातून काढून ठेवलेल्या नमुन्यांवर तसेच जप्त साठयावर सिल व शिक्का नाही. तसेच त्यावर सह्यांचे लेबल देखील नाही. जप्त साठा तसेच विश्लेषणाकरीता काढलेले नमुने सिल करण्यात आले होते, त्यावर उपरोक्त तरतुदींनुसार आवश्यक असणारे सर्व घटक

नमुद करुन लेबलवर संबंधीतांच्या सह्या घेण्यात आल्या होत्या, सदर लेबल त्यावर चिकटविण्यात आले होते व ते नंतर सिलबंद करण्यात आले होते, याबाबतचा उल्लेख तपासणी अहवाल (नि.क्र.४०) तसेच जप्ती पंचनामा (नि.क्र.४१) व खबर (नि.क्र.४२) यामध्ये कोठेही करण्यात आलेला नाही. त्याविषयी खबर देणार हिने तिच्या साक्षीदरम्यान देखील काहीही नमुद केलेले नाही. यावरुन असे दिसून येते की, खबर देणार हिने जप्त साठयातून विश्लेषणाकरीता नमुने काढताना विहीत कायदेशीर तरतुदींचे पालन केलेले नाही.

**१९.** आरोपी क्रमांक १ च्या ताब्यातून असुरक्षित व अपायकारक असे प्रतिबंधीत अन्नपदार्थ मिळून आले, हे सिद्ध करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.६८) अभिलेखावर दाखल करण्यात आला आहे. सदर अहवाल (नि.क्र.६८) चे अवलोकन करता असे दिसून येते की, विश्लेषणाकरीता प्राप्त झालेले नमुने सिलबंद होते, त्यातील सिल अबाधित होते, याबाबतचा कोणताही उल्लेख त्यामध्ये करण्यात आलेला नाही. तसेच ते नमुने कोणत्या प्रकरणातील होते, हे देखील सदर अहवाल (नि.क्र.६८) मध्ये नमुद करण्यात आलेले नाही. सदर अहवाल (नि.क्र.६८) सिद्ध करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे संशोधन अधिकारी डॉ. शिंदे (अ.सा.क्र.५) यांची साक्ष नोंदविण्यात आलेली आहे. त्यांच्या साक्षीनुसार अहवाल (नि.क्र.६८) मध्ये नमुद नमुन्यांचे विश्लेषण त्यांनी स्वतः केलेले नाही. त्यावर एच.एस. कुलकर्णी यांची सही आहे, हे या साक्षीदाराने मान्य केले आहे. या साक्षीदाराच्या साक्षीनुसार सदर नमुन्यांचे विश्लेषण करण्याकरीता अन्न सुरक्षा व मानके सक्षम प्राधिकारी यांनी प्रसिद्ध केलेल्या पद्धतीचा अवलंब केला व त्यातील निकषांनुसार अहवाल दिला. तथापि,

यापूर्वीच नमुद केल्याप्रमाणे सदर नमुन्यांचे विश्लेषण या साक्षीदाराने केलेले नसून एच.एस. कुलकर्णी यांनी केलेले आहे. सदर विश्लेषण त्यांनी या साक्षीदाराच्या समक्ष केले होते, असे या साक्षीदाराचे कथन नाही. नमुन्यांचे विश्लेषण करताना कोणत्या पद्धतीचा अवलंब केला, याबाबतचा उल्लेख अहवाल (नि.क्र.६८) मध्ये नाही. असे असताना डॉ. शिंदे (अ.सा.क्र.५) यांनी उपरोक्त कथन कशा आधारे केले, हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे या साक्षीदाराच्या साक्षीबाबत संशय निर्माण होतो. या शिवाय अहवाल (नि.क्र.६८) हा प्रस्तुत प्रकरणातील जप्त साठयातील नमुन्यांच्या विश्लेषणाबाबतचाच आहे हे देखील संशयातीतपणे सिद्ध होत नाही. त्यामुळे सदर अहवाल (नि.क्र.६८) च्या आधारे आरोपी क्रमांक १ च्या ताब्यात मिळून आलेले कथित अन्नपदार्थ असुरक्षित, अपायकारक व प्रतिबंधीत होते, हे संशयातितपणे सिद्ध होत नाही.

२०. एवढेच नाही तर, अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ चे कलम ४२(२) तसेच अन्न सुरक्षा व मानके नियम, २०११ मधील नियम २.४.५ नुसार विश्लेषणकरीता सिलबंद नमुने प्राप्त झाल्यानंतर अन्न विश्लेषक यांनी नमुने प्राप्त झाल्यापासून १४ दिवसांच्या आत तपासणी पुर्ण करुन तपासणी अहवाल पदावधीत अधिकारी यांच्याकडे पाठविणे बंधनकारक असते. तसेच जर सदर विहित मुदतीमध्ये तपासणी पुर्ण होवू शकत नसेल तर त्याबाबतची कारणे व आवश्यक असणारा अतिरिक्त वेळ याची माहिती संबंधीत पदावधीत अधिकारी व आयुक्त, अन्न सुरक्षा यांना कळविणे आवश्यक असते. प्रस्तुत प्रकरणात प्रतिबंधीत अन्न पदार्थांचे नमुने अन्न विश्लेषक यांच्याकडे दिनांक २६/०५/२०१५ रोजी पाठविण्यात आल्याचे व त्याच दिवशी प्रयोगशाळेत प्राप्त झाल्याचे दिसून येते.

तथापि, अन्न विश्लेषक यांनी अहवाल (नि.क्र.६८) दिनांक २९/०६/२०१५ रोजी म्हणजेच विलंबाने पाठविल्याचे दिसून येते. सदर विलंबाची कारणे तसेच लागणारा अतिरिक्त वेळ पदावधीत अधिकारी तसेच आयुक्त, अन्न सुरक्षा यांना लेखी कळविण्यात आले असल्याचे देखील अभिलेखावरुन दिसून येत नाही. त्यामुळे अहवाल (नि.क्र.६८) च्या सत्यतेबाबत व पारदर्शकतेबाबत दाट संशय निर्माण होतो.

**२१.** अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ चे कलम ४२(३) नुसार अन्न विश्लेषकाचा अहवाल प्राप्त झाल्यापासून १४ दिवसांच्या आत पदावधीत अधिकारी यांनी अन्न सुरक्षा आयुक्त यांच्याकडे खटला दाखल करण्याच्या परवानगीकरीता शिफारस करणे बंधनकारक असते. प्रस्तुत प्रकरणात तपासणी अहवाल (नि.क्र.६८) दिनांक २९/०६/२०१५ रोजी पाठविण्यात आल्याचे दिसून येते. मात्र खटला दाखल करण्याची परवानगी मिळण्याकरीता पदावधीत अधिकारी यांनी संमतीकरीता पाठविलेला प्रस्ताव (नि.क्र.६५) हा दिनांक ०६/०२/२०१६ रोजीचा आहे. म्हणजेच पदावधीत अधिकारी कोडगिरे (अ.सा.क्र.४) यांनी खटला दाखल करण्याची परवानगी मिळण्याची पाठविलेला प्रस्ताव (नि.क्र.६५) हा अहवाल (नि.क्र.६८) मिळाल्यापासून १४ दिवसांच्या विहित कालावधीत आयुक्त, अन्न सुरक्षा यांच्याकडे सादर केलेला नाही. या बाबीचा अभियोग पक्षाच्या बाजूच्या सत्यतेवर प्रतिकूल परिणाम होतो. एकंदरीतच कायदेशीर तरतुदींचे पालन झालेले नसल्याने तसेच विहित कालावधीमध्ये कायदेशीर प्रक्रियांचे पालन केलेले नसल्याने अभियोग पक्षाच्या बाजूच्या सत्यतेबाबत पुन्हा दाट संशय निर्माण होतो.

२२. उपरोक्त परिस्थीतीत, आरोपी क्रमांक १ च्या ताब्यात मानवी शरीरास अपायकारक असणारे तसेच प्रतिबंधात्मक आदेश (नि.क्र.३९) मध्ये नमुद प्रतिबंधीत अन्नपदार्थ मिळून आले, हे अभिलेखावर दाखल तोंडी व कागदोपत्री पुराव्या आधारे संशयातीतपणे सिद्ध झालेले नाही. एवढेच नाही तर मुलतः आरोपी क्रमांक १ च्या ताब्यात अशा प्रकारचे असुरक्षित व अपायकारक प्रतिबंधीत अन्नपदार्थं विक्रीकरीता साठवणूक केलेले मिळून आले, हे देखील संशयातीतपणे सिद्ध झालेले नाही.

२३. आरोपी क्रमांक १ ने भा.दं.वि. कलम ३२८ प्रमाणे गुन्हा केल्याबाबत त्याच्यावर दोषारोप ठेवण्यात आला आहे. तथापि, सदर आरोपीने मानवी शरीरास अपायकारक होईल अशा प्रकारच्या अन्न पदार्थांची विक्री केली व त्या अन्न पदार्थांचे सेवन एखाद्या व्यक्तीने केले व त्यामुळे त्या व्यक्तीस त्रास झाला अथवा इजा झाली याबाबत देखील कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे सदर दोषारोप सिद्ध होत नाही.

२४. प्रस्तुत प्रकरणात आरोपी क्रमांक १ वर भा.दं.वि. कलम १७९, १८८ व २७३ प्रमाणे गुन्हा केल्याचा देखील आरोप ठेवण्यात आला आहे. भा.दं.वि. कलम १७९ प्रमाणे गुन्हा सिद्ध होण्याकरीता खबर देणार अथवा कोडगिरे (अ.सा.क्र.४) यांनी कायदेशीर अधिकारांचा वापर करुन आरोपी क्रमांक १ च्या ताब्यात मिळून आलेला साठा त्याला कोठून व कोणाकडून प्राप्त झाला याबाबत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यास सदर आरोपीने नकार दिला, हे सिद्ध होणे आवश्यक असते. तथापि, याबाबतचा देखील कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुराव अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे सदर आरोप देखील सिद्ध होत नाही.

२५. भा.दं.वि. कलम १८८ प्रमाणे गुन्हयाची दखल घेण्याकरीता फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १९५(१)(अ) मधील तरतुदींची पुर्तता होणे आवश्यक असते व संबंधीत लोकसेवकाने अथवा त्याने प्राधिकृत केलेल्या दुस-या लोकसेवकाने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २(ड) मध्ये स्पष्ट करण्यात आलेल्या व्याख्येनुसार लेखी फिर्याद दाखल केल्याखेरीज अशा प्रकरणाची दखल घेता येत नाही. अशा गुन्ह्याकरीता प्रथम खबरी अहवाल अथवा प्रथम खबर दाखल करता येत नाही. सदर मुद्दयावर **माननीय मुंबई उच्च न्यायालय** यांनी **Shrinath Gangadhar Giram Vs. State of Maharashtra, (2017) 02 BOM CK 0094** या प्रकरणातील न्यायनिर्णयामध्ये उहापोह केलेला आहे व असा निष्कर्ष नोंदविला आहे की, भा.दं.वि. कलम १८८ प्रमाणेच्या गुन्हयाकरीता फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २(ड) तसेच कलम १९५(१)(अ)(i) मधील तरतुदीनुसार प्रथम खबर दाखल करणे समर्थनीय नाही. अशा प्रकरणामध्ये ज्या लोकसेवकाचा आदेश माणण्यात आला नव्हता अथवा पुर्तता करण्यात आली नव्हती, त्यानेच संबंधीत दंडाधिकारी यांच्याकडे फिर्याद दाखल करणे आवश्यक असते आणि अशी पुर्तता केली नसल्यास त्या कलमा अंतर्गत अभियोग समर्थनीय होत नाही.

२६. त्याचप्रमाणे **माननीय सर्वोच्च न्यायालय** यांनी **Ramnath Vs. State of Uttarpradesh and Others, (2024) 3 SCC 502** आणि **Sushil Kumar Gupta Vs. State of West Bengal, SLP (Crl.) 15495 of 2023, Criminal Appeal No.1798/2024 decided on 22nd March, 2024,** या न्यायनिर्णयामध्ये असा निष्कर्ष नोंदविला आहे की, भा.दं.वि. कलम २७२, २७३ आणि अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ चे कलम ५९ अंतर्गतच्या

गुन्हयाकरीता एकाच वेळी अभियोग दाखल होवू शकत नाही. अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ चे कलम ८९ अन्वये सदर कायद्यातील कलम ५९ मधील तरतुद भा.दं.वि. कलम २७२, २७३ मधील तरतुदींपेक्षा वरचढ (Overriding) ठरते व त्यामुळे या दोन्ही कायद्यांअंतर्गत एकाच घटनेकरीता समांतर अभियोग चालविता येणार नाहीत. पर्यायाने प्रस्तुत प्रकरणात देखील अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ चे कलम ५९ अन्वये आरोपी विरुद्ध अभियोग चालविण्यात येत असल्याने भा.दं.वि. कलम २७३ प्रमाणेच्या गुन्हयाकरीता अभियोग कायदेशीरपणे टिकणार (Tenable) नाही.

**२७.** उपरोक्त विवेचनावरुन हे स्पष्ट झाले आहे की, प्रस्तुत आरोपी क्रमांक १ ने भा.दं.वि. कलम १७९, १८८, २७३, ३२८ व अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ चे कलम २६(२)(i), सह कलम ३(i)(zz)(v), दंडनीय कलम ५९ तसेच कलम २६(२)(iv), २७(३)(डी) आणि कलम २७(३)(इ) अन्वये गुन्हा केला आहे, हे संशयातीतपणे सिद्ध झालेले नाही. त्यामुळे सदर कलमाप्रमाणे गुन्हा केल्याबाबत ठेवण्यात आलेल्या दोषारोपाकरीता सदर आरोपीस दोषी धरता येणार नाही. सबब, **मुद्दा क्रमांक १ ते ७** चा निष्कर्ष **नकारार्थी** आहे.

## मुद्दा क्रमांक ८ करीता :-

**२८.** आरोपी क्रमांक १ ने भा.दं.वि. कलम १७९, १८८, २७३, ३२८ व अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ चे कलम २६(२)(i), सह कलम ३(i)(zz)(v), दंडनीय कलम ५९ तसेच कलम २६(२)(iv), २७(३)(डी) आणि कलम २७(३)(इ) प्रमाणे गुन्हा केल्याबाबत त्याचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप संशयातीतपणे सिद्ध झालेले नाहीत. त्यामुळे तो सदर दोषारोपातून निर्दोष मुक्त

होण्यास पात्र आहे. कथित जप्त पान मसाले, सुगंधीत तंबाखू व गुटखा वरिष्ठ न्यायालयात दाद मागण्याचा कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नष्ट करणे उचित होईल. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ अन्वये वरिष्ठ न्यायालयात हजर होण्याकामी रक्कम रुपये ३०,०००/- चा वैयक्तीक जातमुचलका सादर करण्याचे निर्देश आरोपी क्रमांक १ ला देणे देखील आवश्यक आहे. सबब, मुद्दा क्रमांक ८ च्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे -

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्रमांक १ **सुरेश मिलापचंद ओसवाल** यास भारतीय दंड विधान कलम १७९, १८८, २७३, ३२८ व अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ चे कलम २६(२)(i), सह कलम ३(i)(zz)(v), दंडनीय कलम ५९ तसेच कलम २६(२)(iv), २७(३)(डी) आणि कलम २७(३)(इ) प्रमाणे गुन्हा केल्याबाबत ठेवण्यात आलेल्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचा जातमुचलका व जमानत बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत. |
| ३. | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ अन्वये सदर आरोपीने रु.३०,०००/- चा वैयक्तिक जात मुचलका सादर करावा. |
| ४. | वरिष्ठ न्यायालयात दाद मागण्याचा कालावधी संपल्यानंतर जप्त मुद्देमाल कथित पान मसाले, सुगंधीत तंबाखू व गुटखा नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावा. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by JYOTI VILAS PEKHALE
Date: 2026.07.31 15:26:53 +0530

**दिनांकः- ३०/०७/२०२६** **(ज्यो.वि.पेखळे-पुरकर)**
तदर्थ जिल्हा न्यायाधीश -२ तथा
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, पुणे

## भाग - क

### (अभियोग पक्षातर्फे / आरोपींतर्फे / न्यायालयातर्फे साक्षीदारांची यादी)

**अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार -**

| साक्षीदार क्र. | नाव | निशाणी | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|---|
| १. | अन्न सुरक्षा अधिकारी, अस्मिता जयंत टोणपे | ३८ | खबर देणार |
| २. | प्रशांत राजेंद्र गायकवाड | ६२ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| ३. | राजेश तुकाराम शेजवळ | ६३ | मुद्देमाल नष्ट पंचनाम्यावरील पंच |
| ४. | सहाय्यक आयुक्त (अन्न) शिवकुमार बाबुराव कोडगिरे | ६४ | साक्षीदार |
| ५. | संशोधन अधिकारी, डॉ. रविंद्र मधुकर शिंदे | ६७ | विश्लेषण अहवालावरील साक्षीदार |
| ६. | देवेंद्र गोविंद काळभोर | ६९ | घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच |
| ७. | पोलीस उपनिरीक्षक, नारायण शामराव मोरे | ७१ | तपासी अधिकारी |

**ब. आरोपींतर्फे साक्षीदार -**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|

**क. न्यायालयातर्फे साक्षीदार -**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|

## (अभियोग पक्षातर्फे / आरोपींतर्फे / न्यायालयातर्फे साक्षीदारांची निशाणी)

### अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार -

| अ.क्र | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | ३९ | प्रतिबंधात्मक आदेश |
| २. | ४० | तपासणी अहवाल |
| ३. | ४१ | जप्ती पंचनामा |
| ४. | ४२ | खबर |
| ५. | ४३ | छापील प्रथम खबर |
| ६. | ४४ | नमुने तपासणीसाठी पाठविलेले पत्र |
| ७. | एकत्रीतपणे ४५ | संबंधीत उत्पादक यांना पाठविलेले एकूण १२ पत्र |
| ८. | एकत्रीतपणे ४६ | संबंधीत राज्यातील अधिका-यांना पाठविलेले एकूण १२ पत्र |
| ९. | ४७ | जप्त साठा नष्ट करण्याबाबत परवानगी मिळण्याकरीता अर्ज |
| १०. | ४८ | जप्त साठा नष्ट करण्याचा परवानगी आदेश |
| ११. | ४९ | जिल्हा सहकारी दुध उत्पादक संस्था, कात्रज यांच्या अग्नीकुंडामध्ये जप्त साठा नष्ट करण्याची परवानगी मिळण्याकरीता दिलेले पत्र |
| १२. | ५० | जिल्हा सहकारी दुध उत्पादक संस्था, कात्रज यांनी दिलेली परवानगी |
| १३. | ५१,५२ | लोणीकाळभोर पोलीस ठाणे यांना तपासाच्या |

| | | |
|---|---|---|
| | | प्रगतीबाबत माहिती मागविण्याकरीता दिलेले पत्र |
| १४. | ५३ | सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई यांचेकडे सादर केलेला अहवाल |
| १५. | ५४ | आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई यांचेकडील खटला न्यायालयात दाखल करण्याचा मंजुरी आदेश |
| १६. | ६५ | आयुक्त यांच्याकडे संमतीसाठी पाठविलेला प्रस्ताव |
| १७. | ६६ | आयुक्त यांच्याकडून प्राप्त झालेल्या संमती आदेश खबर देणार यांना पाठविल्याबाबतचे पत्र |
| १८. | ६७ | आयुक्त यांचेकडून प्राप्त झालेला संमती आदेश |
| १८. | ६८ | जप्त नमुन्यांचा विश्लेषण अहवाल |
| २१. | ७२ | घटनास्थळ पंचनामा |

**ब. आरोपींतर्फे साक्षीदार -**

| अ.क्र | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|

**क. न्यायालयातर्फे साक्षीदार -**

| अ.क्र | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|

**ड. महत्वाचे पुरावे -**

| अ. क्र. | मुद्देमाल वस्तु क्र. | तपशील |
|---|---|---|

*****

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of PDF file Judgment are same word for word as per original Judgment.

| | |
|---|---|
| Name of Steno | **Priyanka M. Nikam**<br>(Stenographer Grade-III) |
| Court Name | **J. V. Pekhale-Purkar,**<br>Ad-hoc District Judge-2 and Additional Sessions Judge, Pune. |
| Date of Judgment | 30/07/2026 |
| Judgment signed by Presiding Officer on | 31/07/2026 |
| Judgment uploaded on | 31/07/2026 |